# तावी सादर करत आहे पर्सनल केअर उत्पादनांची पहिलीच रेंज फ्लिपकार्ट आणि मिंत्रावर

*या नव्या रेंजमध्ये ब्युटी आणि हेल्थसाठी नैसर्गिक घटकांमधील वैशिष्ट्यांचा वापर*

*या उत्पादनांमध्ये 'ट्रूली नॅचरल', 'सेफ अ‍ॅण्ड रीअल' हेअर क्लीन्जर, हेअर कंडिशनर्स आणि फेस वॉशेसचा समावेश*

**बंगळुरु - २५ फेब्रुवारी २०२१ :** पारंपरिक भारतीय टेक्सटाईल कला आणि आधुनिक फॅशन संकल्पनांचा मेळ घालणाऱ्या तावी या मिंत्राच्या बहुसांस्कृतिक लाइफस्टाइल ब्रँडने आता पर्सनल केअर उत्पादन विभागात प्रवेश केला आहे. मिंत्रा आणि फ्लिपकार्ट यांनी एकत्रितरित्या तावी ब्रँड अंतर्गत विविध प्रकारचे हेअर क्लीन्झर्स, हेअर कंडिशनर्स आणि फेस वॉशेस तयार केले आहेत. तावी ब्रँडने आधुनिक ग्राहकांना सुयोग्य वाटणाऱ्या पारंपरिक कलेला पुनरुज्जीवित करत आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या प्रयत्नांना अधिक चालना देत नव्याने सादर करण्यात आलेली पर्सनल केअर उत्पादने खऱ्या अर्थाने नैसर्गिक आहेत. यात काही भारतीय पारंपरिक फॉर्म्युल्यांना समकालीन स्वरूप देण्यात आले आहे. भारतातील हजारो ग्रामीण महिला आणि स्थानिक समुदायासोबत काम करणाऱ्या खादी इंडस्ट्री आणि लघु उद्योगांच्या सहकार्याने ही उत्पादने तयार करण्यात आली असल्याने ती खऱ्या अर्थाने भारतीय मुळे जपणारी आहेत.

मागील काही वर्षात त्वचेच्या काळजीसाठी नैसर्गिक किंवा ऑरगॅनिक उत्पादने वापरण्यावर ग्राहकांचा अधिकाधिक भर दिसून येत आहे. असोचॅमच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार भारतातील पर्सनल केअर बाजारपेठ २०३५ सालापर्यंत २० अब्ज डॉलर्सचा पल्ला गाठेल. यात वाढत्या महत्त्वाकांक्षा आणि खर्च करण्यायोग्य उत्पादनातील वाढ यांची भर पडणार आहे. ग्राहकांना शाश्वत 'मेड-इन-इंडिया' ब्रँड्स हवे असतात, जे त्यांना नैसर्गिक, रसायनांपासून मुक्त उत्पादनांचा अनुभव मिळू शकेल. या वाढत्या मागणीला पूर्ण करण्यासाठी तावी पर्सनल केअर रेंजमधील नैसर्गिक उत्पादने वनस्पतीजन्य घटकांपासून बनवण्यात आली आहेत आणि भृंगराज, पपई, कोरफड, रिठा, शिकेकाई, आवळा, नारळाचे तेल आणि उटणं अशा शतकानुशतके भारतात वापरल्या जाणाऱ्या पारंपरिक घटकांची वैशिष्ट्ये यात सामावली आहेत.

‘*तावी रेंज ऑफ पर्सनल केअर उत्पादने खऱ्या अर्थाने नैसर्गिक, अस्सल आणि सुरक्षित आहेत म्हणजेच* ‘Natreal™’ *ती आहेत’* आणि ग्राहकांना भारतातील फ्लिपकार्ट आणि मिंत्रा अशा ई-कॉमर्स कंपन्यांच्या अस्सलतेची जोड असलेली विश्वासार्ह आणि उच्च दर्जाची उत्पादने मिळतील याची खातरजमा यात होते.

तावीची नवी रेंज सादर करताना **फ्लिपकार्टच्या बीजीएमएच, फर्निचर आणि ग्रोसरी विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनिष कुमार** म्हणाले, “*अस्सल आणि नैसर्गिक पर्सनल केअर उत्पादनांची मागणी वाढत असल्याच्वो आम्हाला फ्लिपकार्टच्या व्यासपीठावरील ग्राहकांच्या खरेदी वर्तनावरून लक्षात आले. बाजारपेठेतील दरी भरून काढणारी उत्पादने ग्राहकांना देऊ करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. तावीची नॅचरल पर्सनल केअर रेंज सादर करताना मिंत्रासोबत भागीदारी केल्याने आम्हाला ही दरी भरून काढण्याची आणि अस्सल मूळ उत्पादनांची मागणी पूर्ण करण्याची संधी मिळाली आहे. पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या फॉर्म्युल्यांना समकालीनतेची जोड देत आधुनिक जीवनपद्धतीला योग्य अशी ही उत्पादने तयार करण्यात आली आहेत. अगदी खऱ्या अर्थाने व्होकल फॉर लोकल उत्पादनांची राष्ट्राची मागणी तावी पर्सनल केअर कलेक्शनमधून पूर्ण होईल आणि या उत्पादनांमध्ये कसा दर्जा असणार आहे हे सुद्धा यातून स्पष्ट होते.*”

**मिंत्रा फॅशन ब्रँड्सचे वरिष्ठ संचालक निशांत प्रसाद** म्हणाले, “*एक ब्रँड म्हणून तावीने अल्पावधीत मोठा पल्ला गाठला आहे आणि आपल्या देशातील संपन्न संस्कृतीचा सन्मान करणारे, त्याचे कौतुक असणाऱ्या ग्राहकांमध्ये या ब्रँडने स्वत:ची एक ओळख निर्माण केली आहे. आजघडीला तो फक्त एक ब्रँडहून अधिक आहे आणि अनेक शतकांपासून आपल्या देशाची ओळख असलेल्या पारंपरिक कला आणि कलाकुसरीला चालना देण्याच्या मिंत्राच्या बांधिलकीचे ते प्रतीक आहे. ब्यूटी आणि पर्सनल केअर विभागात मिंत्राचे स्थान अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने तावीचा नॅचरल पर्सनल केअर उत्पादनांमधील प्रवेश अत्यंत महत्त्वाचा आहे. यातून लाखो ग्राहकांना अगदी नैसर्गिक, ‘मेड इन इंडिया’ सौंदर्य उत्पादने उपलब्ध होणार आहेत. यामुळे ग्राहकांना उत्तम उत्पादने उपलब्ध होतीलच. शिवाय, अशी जागतिक दर्जाची उत्पादने निर्माण करण्यात आवश्यक घटक पुरवणाऱ्या परिसंसथेलाही चालना मिळेल.*”

देशभरातील ग्राहकांच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण करण्यासाठी *मेड फॉर इंडिया, बाय इंडिया* उत्पादने सादर करून उत्पादनांची एक भक्कम जंत्री तयार करण्याचा प्रयत्न मिंत्रा आणि फ्लिपकार्टकडून सातत्याने होत असतो. या उत्पादनयादीतील नवी भर म्हणजे तावीची पर्सनल केअर रेंज.

वनस्पतीजन्य घटकांपासून बनवलेली, कोणतीही धोकादायक रसायने नसलेली ही उत्पादने डर्मेटॉलॉजिकली तपासण्यात आली असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचीही खात्री पटते. २०१८ मध्ये सादर झालेल्या तावीने देशभरातील विविध राज्यांमधील स्थानिक कलाकारांसोबत थेट किंवा एनजीओजच्या माध्यमातून काम केले आहे. सध्या आठ एनजीओजच्या माध्यमातून ते १५००० हून अधिक कारागिरांना पाठबळ देत आहेत. सरासरी १२००-१४०० रुपयांदरम्यान असलेल्या उत्पादनांमध्ये हा ब्रँड महिला आणि पुरुषांसाठीच्या कपडे आणि फुटवेअरमध्ये ८०० हून अधिक पर्याय देऊ करतो. महिलांसाठीच्या उत्पादनांमध्ये खास आकर्षण म्हणजे हँड ब्लॉक प्रिंट आणि हातमागावरील कपडे जसे की कुर्ते, ड्रेसेस, स्कर्ट, सलवार-कमीज-दुपट्टा आणि टॉप्स. तर पुरुषांसाठीच्या कपडयांमध्ये शर्ट आणि कुर्त्यांचा समावेश आहे. २०२१ मध्ये हा ब्रँड बॅग्स, होम आणि साडी या विभागात प्रवेश करण्याच्या विचारात आहे.

*तावीची स्किन आणि हेअरकेअर प्रोडक्ट्स इथे पहा :*

***Flipkart:*** *https://www.flipkart.com/taavi-brand-store (App and m-site only).*

***Myntra**: https://www.myntra.com/taavi-personal-care*

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and Flipkart Wholesale. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 300 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com**